


# कॉफी पाऊस आणि... कविता

सचिन मधुकर गोटे

WRITERSGRAM PUBLICATIONS

कॉफी पाऊस आणि... कविता

*Poetry by* Sachin Madhukar Gote
First Impression: March 2020

© Sachin Madhukar Gote

**Published by:** Writersgram Publications, New Delhi

www.writersgram.com
publications@writersgram.com

Sachin Madhukar Gote asserts the moral right to be identified as the author of this book.

All rights reserved. No part of this publication may be reproduced, stored in or introduced into a retrieval system or transmitted, in any form, or by any means (electrical, mechanical, photocopying, recording or otherwise) without the prior written permission of the publisher. Any person who does any unauthorized act in relation to this publication may be liable to criminal prosecution and civil claims for damages.

जन्म देणाऱ्या देवकीला
आणि पोसणाऱ्या यशोदेला..
कायम अर्पण...!

# आजही वाटतं

माझ्याकडे नजर टाकून
दिलेला नकार
माझ्याकडे न बघता दिलेल्या
होकारा इतकाच ताकदीचा होता !
नव्हता! म्हणण्याची ताकद ठेवतेस ?
या बाष्कळ संस्कृतीची
पाल्हाळे सांगू नकोस
सोयीच्या ठिकाणी समर्थन
दाखविणारी सर्वमान्य
विकृती आहे ती ......
इथे प्रेम करणं
गुन्हा नाही ;
ते निभवणं
गुन्हा आहे-
आत्मिक आणि सामाजिक सुध्दा !
पुन्हा सांगतो,
एकदा मनापासुन
नाही म्हण
.....म्हणण्याची ताकद ठेवतेस ?

# मी मनमुक्त ,आसमंताचा राजा

मी मनमुक्त आसमंताचा राजा
एका हाकेच्या अंतरावर चंद्र
रात्रीचा बेधुंद अफाट सागर
आणि माझे निर्विकार डोळे

होता - क्षणांचे पाखरु मुठीबंद
एका नजरेच्या इशाऱ्यावर
पालटणारे नक्षत्र
आणि मीच तो स्वामी
या चारही दिशांचा

माझे प्रेम .... एक आभास
आकाशात खेळणाऱ्या चांदण्याचे श्वास
एक रेखीव मूर्तिमंत कल्पना
आणि अस्वस्थ वाऱ्याचा
वेडा सहवास

मी शब्दबंबाळ रक्ताचा साठा
लाखो ठिंणग्यांचा जमाव
एका अतृप्त ज्वालेची मूर्ती
मी एक अभंग मूर्ती
आणि मीच प्रतिस्पर्धी माझा
मी मनमुक्त,
आसमंताचा राजा

# माझ्या खोलीतला मी

माझ्या खोलीतला मी
तितकाच रिकामा
ती अस्वस्थ ओढ
आणि तो निकामी प्रकाश

त्या खिडकीएवढाच अजास्त्र ...
अंगावरचे तुषार
अंगावरुन मागे फेकणारा
सगळ्यात असूनही विरळाच !

प्रत्येक शब्द बेगडी
संवाद रहित
रात्री जमणाऱ्या काळोखा एवढे
आणि तितकेच प्रखर
दुपारच्या सूर्यकिरणांएवढे !

भिंतीवरचा रंगाचा साज
अंशपूर्ण अपुरा
अंकातून सुरुवात
तर शुन्यात पुरा

आपणही असेच
एकमेकांना पारखे
ना तुझी पूर्ण ओळख मला
ना ती, माझी तुला
फक्त भिजलेली तमा
कालच्या इतकीच
आजच्याता जमा

# श्वास

एक विनाशर्त, श्वासांच्या
उपहारसोबत मिळालेले आयुष्य,

आईच्या छातीशी बिलगून
केलेला काही श्वासांचा पाणउतारा
सोबत .........
एक निर्जीव झोप .....

डोळ्यांच्या पाकळ्या उघडल्यांनतर
काही श्वासांच्या हवेत विरलेल्या हालचाली
आणि सोबत
एक निर्जीव भेदक नजर .....

घरात चटईवरचा टेडीबिअर
आणि त्याला दिलेले माझ्यातले
काही श्वास
आणि सोबत
माझे थोपटणारे हात .....
संपले आयुष्य

# स्वप्न

तिच्या बंद होत चाललेल्या पापणीत
एक स्वप्न अलगद ठेवीत
मी तिला म्हणालो -
जरा जपून ठेवशील का ?
कालच बघितलंय् !

उगाच पुन्हा धक्क्याने
उद्ध्वस्त होईल .....कदाचित !

मला वेळ नाही गं;
पुन्हा दुसरं स्वप्न बघायला
आणि,
तुला तरी वेळ आहे का
पुन्हा माझ्या स्वप्नात यायला !

# तेव्हा ...... तुझे

तू अशी रोज
नवीन कशी दिसतेस् ?
कालच्यापेक्षा सुंदर
पण उद्यापेक्षा कमीच
आणि मग,
कवितांच्या कॅन्व्हॉसवर
शब्दांच चित्र रेखाटणं
कठिण होऊन बसतं

उद्यापासून तुला बघायला
कदाचित ..... जमणार नाही मला

तेव्हा तुझं
उद्या - परवाचं रु पडं
कसं रेखाटू ?

जिऑमेट्रीक प्रोग्रेशननं की
अरिथमेटीक प्रोग्रेशननं

# झंझावात

अनादि अनंत काळापासून
स्वत:च्याच अस्तित्वाच्या शोधात
मी एक झंझावात !

माया, लळा, संस्कार प्रतिष्ठा
बंधमुक्त, पण बंदिशाळेत
एकाहुन एक लाचारिच्या बेड्या
आणि स्वप्नांची राख कवेत
मी एक झंझावात!

रक्ताने माखलेल्या सूर्याचे प्रेत
अस्थिपंजरात रुतून पडले
हाती फक्त पणत्याच उरल्या
काजवेही मरणाच्या कुशीत दडले

नामिकता ती जळून गेली
अनामिकच राहिली अखेर
मी एक झंझावात !

उमलल्या फुलांचे भाग्य बघून
स्फूंदन करीत कळी रडली
साऱ्याच फुलांनी रंग घेतले
माझीच काया का श्वेत पडली ?

लढेन मी त्या वादळाशी
होऊ दे तो नि:पात
मी एक झंझावात !

# आई

या तप्त निखारी आज ती निद्राधीन
झाले आहे
एका वादळाची मैत्री आज त्याच्याच
प्रेताशी झाली आहे

सगळे आकाश काळोखाने
भरले आहे
वादळाने मात्र, तेवढे चंद्राचे
स्थान हेरले आहे.

दिवसा तेवढी ती किरणांनी
वेढलेली असते
रात्रीच्या अंधारात मग तिचे
खरे रुप दिसते

वादळ शमल्यावर मात्र
अनेक प्रश्न सुटतात
खरंच .....
इवल्याशा खड्याने सुध्दा
पाण्यावर तरंग उठतात

# शेकहॅन्ड

रुळावरुन धावणाऱ्या
त्या अजस्त्र धुडाने
अनेक प्रश्न मागे टाकले
एका अपुऱ्या वाक्यासकट

काल पुन्हा, एक कप कॉफी
बरोबर
मी काही आठवणीही
रीचवल्या ....

खरंच,
विनासायास नाती जुळवली
की असेच चटके बसणार
पण,
त्या चटक्यांमधे कुठेतरी
एक गारवा होता
तिचा शेवटचा
शेकहॅन्ड !

# मला तुकड्या तुकड्यात जगायच नांही आहे !

मनाचे लचके तोडून .....
अंगभर भिरकावून
या अनोळखी रस्त्यावर
मला विखरायचं नाही आहे
मला तुकड्या तुकड्यात जगायचं नाही आहे !

जरी सगळ्यांना हवाहवास मी
असेल हजारोंना नकोसाही मी
मला या वादात पडायचं नाही आहे !
मला तुकड्या तुकड्यात जगायचं नाही आहे !

मी ही विणले आहेत मनोमनी,
मानवी नात्यांचे धागे
स्वत:पुरतेत मात्र
राखून ठेवले आहे...
इतरांचे धागे मला उकलायचे नाही आहे
मला तुकड्या तुकड्यात जगायचं नाही आहे !

इवल्याश्या ओंजळीत मी
साऱ्या जगाला साठवले
अगदी जपून केवळ माझ्यासाठी
पण,
इतरांचे जग मला उकारायचं नाही आहे
मला तुकड्या तुकड्यात जगायचं नाही आहे !

लाखो नसेल प्रितीचे मनोरे
नसू देना, स्वप्नांचे किंवा माझे

पण,
इतरांचे मनोरे उद्ध्वस्त करुन
मला थडगं उभारायचं नाही आहे
मला तुकड्या तुकड्यात जगायचं नाही आहे !

# दिवस तुझे ते ......

दिवस तुझे ते ....
आठवायचे
आठवणीच्या धुंदीचे

दिवस तुझे ते
रात्रीच्या प्रलयाचे
प्रखर उन्हाचे
लाजऱ्या थंडीचे
पावसाच्या झुंडीचे

दिवस तुझे
माळयावरच्या गारव्याचे
रानातल्या मारव्याचे
थव्याथव्याने विहरणाऱ्या
पक्ष्यांचे, पारव्यांचे

दिवस तुझे ते
वादळ शमण्याचे
माझ्यात रमण्याचे
घरी कधी खोटे बोलून
सिनेमाला जमण्याचे

दिवस माझे हे ......
तुला आठवण्याचे
तुझ्या स्मृतीत रमण्याचे
तुझ्यासाठी लिहिलेल्या...
शब्दांवर थांबण्याचे
दिवस माझे हे...
तुझ्याविना जगण्याचे

# काल

अशीच आठवणींची पाने
नकळत चाळली गेली
लक्षात आलं,
काही पानं उगाच कोरी होती

तर काहींवर
कविता होत्या
बरीच पाने दुमडून
ठेवलेली दिसली
कदाचित काही लिहिण्यासाठी म्हणून !
बिचारी कोरीच मिटलेली.
आणि .... पुन्हा नजर वळली
काही हरवलेल्या पानांच्या
जागेवर
नकळत नाहीशी झालेली पाने......
काय म्हणालात ?
त्यात काय होतं ......?
भूतकाळाचा पडदा किलकिला
करुन पाहिला
साऱ्या जुन्या स्मृतींना उजाळा
देऊन पाहिलंय्
नको खपली काढायला
जखमा होतील पुन्हा नव्या
पुन्हा नको आठवायला
त्या जळाल्या स्मृती !

# आज पुन्हा

आठवणींचे कडेलोट
पुन्हा मनाच्या दरीत
रात्रीचा अर्धचंद्र
एकटाच भिजत .....सरीत

हिरव्या सावल्यांचे रान
घनगर्द शब्दांचा मोगरा
वळणावर पाझरणाऱ्या
तुझ्या, ओढीचा झरा

मी शांत निश्चल
बोलक्या पावसाच्या कुशीत
तिच्या पदराआड दडलेल्या
सुखस्वप्नांच्या राशीत

मी म्हणालो .....
देशील का पुन्हा तू
मऊ कापसाचे रेशिमस्पर्श
का, वेडावशील पुन्हा ?
कोंडून मला ........ तुझ्या मिठीत !

असू दे ....
आज पुन्हा
आठवणींचे कडेलोट
पुन्हा मनाच्या दरीत....
रात्रीचा अर्धचंद्र
एकटाच भिजत सरीत

# मी सुध्दा

का आवडली असेल तो?
मला .... आठवतंय्
वेड्यासारखी बोलायची
फुलण्यासाठी आसुसलेल्या
त्या फुलराणी सारख
हो फुलराणीच .....

बोटांच्या चिमटीत फुटलेल्या
डाळिंबाच्या दाण्यासारखी
हसायची ......... गोssssड

मी विचारलं,

तुला पाऊस आवडतो ?

म्हणाली ...... तुझ्याइतकाच

तुझ्यासारखाच तो भिजवतो

अंगाला बिलगून बसतो

माझ्या मुठीत लपतो

ओठांवर थांबतो

आणि नकळत ..... नाहीसा होतो

मला....

भिजलंलं ठेवून !

पण, मी तरी कुठे ऐकत असतो

मी तर केव्हाच

नकळत नाहीसा झालो सुध्दा

-तिला

भिजलेलं ठेवून !!

# मैत्री

माझ्या मनातल्या गोंगाटाशी
माझ्याच कवितेने स्पर्धा केली
हरल्यानंतर मात्र कवितेने
गोंगाटाशीच मैत्री केली

आता कवितेचे माझ्याशी
पटेनासे झाले
गोंगाटाशिवाय तिला
जिणे नकोसे झाले

# मी  नसेन तेव्हा

मी नसेन तेव्हा
आकाशात टक लावून
उडणाऱ्या विमानाला
पाहण्याची सवय ठेव;
मी नसेन तेव्हा
मी असेनच कुठेतरी,
अशीच थेंबभर
आकाशाची स्वप्नं
कुशीन बाळगून...
मी नसेन तेव्हां
मी पुन्हा उगवेन
कणाकणातून
किंवा झिरपेन
सरीतून की जगेन स्पर्शातून
स्पर्शविना
तेव्हाही नसेन जगत
मी तुझ्याविना
तेव्हा भिनलो असेन
श्वासात तुझ्या
तुझ्या श्वासापर्यंत
आणि मी संपेन, तेव्हा
तुझेही श्वास
कुठं असतील... तुझ्याजवळ?

सांग ना -

जगशल कशी मग ... माझ्याविना?

# तुला आठवतंय ?

एका लयात बांधलेल्या
त्या मोत्यांना
हातांच्या ओंजळीत
घेत, पुन्हा पुन्हा
निखरताना बघितलेलं
तुला आठवतंय ?

मी असेनच कुठेतरी,
अशीच थेंबभर
आकाशाची स्वप्नं
कुशीत बाळगून...
तुला आठवतंय ?
चिंब पायवाटेवरुन
चालताना मला झालेला
थंड वाऱ्यावर उडणाऱ्या
केसांचा स्पर्श .....
आजही तो तितकाच जिवंत आहे
तुला आठवतंय ?

तुझ्याशी बोलतांना
नेहमी शब्दांचा अडथळा व्हायचा
फक्त डोळयांनी
तू किती छान उत्तरं द्यायचीस !
तुला आठवतंय ?

आजही माझ्या
घरातल्या खिडकीमध्ये
तो पाऊस तितकाच ओला आहे
त्या चिंब दिवसात
खिडकीबाहेरुन मला दिलेली हाक
तुला आठवतेय ?

# ज्वालेच्या मुखी

एका शांत निजलेल्या
विहिरीत .....
अचानक आग धगधगायला
लागली
त्या तप्त ज्वालेसह वाहात
सगळयांना गिळत
निघालो होतो...
पण
खरंच सांग,
कसं विझवलंस गं मला ?

# मी

मी खेळतोही
मी जळतोही
मी विझतोही
मी पोळतोही
मी स्पर्शही
मी विरक्तही
मी निखारही
मी प्राजक्तही
मी विरळाही
मी एकसंधही
मी बंदही
मी निर्बंधही
मी मनातही
मी जनातही
मी माझाही
मी तुझाही
मी सैरभैर
मी धुंदमन
मी अंगणातल्या
दवबिंदूचा कण

मी जराही
मी पुराही

मी तुझ्यासाठी वेडाही
मी तुझ्यापरी वेडाही
मी असाही
मी तसाही

# क्लास .....इन् मिडल!

तांब्याच्या गडव्यातील पाण्यात
पुरातन संस्कृती जपली जाते
तर मिनरल वॉटर;
स्टेटस सिम्बॉल!

रुटीन म्हणून .....
दुपारच्या लंचटाईममध्ये
पूर्वी आईने केलेल्या दशम्यांपेक्षा
बायकोनं डब्यात दिलेली,
रेडिमेड अन्नपूर्णा आट्याची पोळी
बघून
फिल्टरपर्यंत जळत आलेल्या सिगरेटीची
आठवण होते
एवढं पांढरपेशेपणाचं ओडोमॉस
अंगावर असताना
सुशिक्षितपणाची मच्छरदानी
गाठीला हवीच का?

त्यापेक्षा बसा
ब्लॅक ऍन्ड व्हाईट
पोर्टेबल टी.व्ही. वर
दुबई शॉपिंग फेस्टीव्हलची
नुस्ती  ऍड बघत

# पुन्हा

पुन्हा त्या नभाला शब्दात बांधशील का?
शब्दातील कंपनांना पुन्हा कवितेत,
गुंफशील का ?
वेड्या काळजाची भाषा
एवढी का अजाण आहे ?
त्या काळजाला पुन्हा
प्रेमाने वेडावशील का ?
एक विजेचा स्फुल्लिंग
आकाशात पुन्हा पेटला
मागे लपलेला इंद्रधनू
पुन्हा मेघांना भेटला

त्या पेटत्या विजेचे चटके
पुन्हा नव्याने सोसशील का ?
पुन्हा त्या नभाला,
शब्दात बांधशील का ?

# काही तुझे .... काही माझे

गालावर अश्रूंचे थेंब
काही तुझे -
काही माझे

दातात मिटलेल्या
ओठांचे चाळे
काही तुझे -
काही माझे

स्वप्नात रमणाऱ्या
डोळयांचे खेळ
काही तुझे -
काही माझे
आकाशातून झिरपणाऱ्या
पावसाचे वेड
काही तुझे -
काही माझे

एकमेकांच्या कुशीत
विसावलेले प्रेम
काही तुझे -
काही माझे

# कधी तू ..... कधी मी

खेळण्याच्या दुकानातले
बाहुली बाहुली
कधी तू, तर
कधी मी

चाव्या फिरवल्या गेल्या
भावना जिवंत झाल्या !
मला हसता आलं
तू बघायला लागली !
माझी पावलं पडली
तू सावरायला लागली !
पावलो पावली
जागत गेलो
कधी तू तर
कधी मी !

आज,
मी कपाटात
तू काचेच्या आड
मी कपाटात
तू काऊंटरवर
मी कपाटातच
आणि तू .....?
आता असहाय रडत

कधी तू, तर
कधी मी

# अभ्यास

माझ अभ्यास कुठेही होतो
घराच्या गच्चीवर
चटई किंवा रजईवर
उशीत तोंड दाबून
नाही तर बसून उशीवर

माझा अभ्यास कुठेही होतो.
टेपरेकॉर्डरच्या सान्निध्यात
किंवा टी.व्ही. च्या कुशीत
रेतीच्या ढिगावर
किंवा फुलांच्या राशीत

माझा अभ्यास कुठेही होतो
पेपरमिंटच्या अंगणात
किंवा लिमलेटच्या खिडकीत
कॅडबरीच्या शेतात
किंवा बिस्किटांच्या वाडीत

माझा अभ्यास कुठेही होतो
पऱ्यांच्या राज्यात
ताऱ्यांच्या देशात
चंद्राच्या बेडरुममध्ये
किंवा पप्पांच्या खिशात

माझा अभ्यास कुठेही होतो

आजीच्या गोष्टीतल्या
राक्षसांच्या गुहेत
किंवा स्मशानात
जिथे असतात, भूत प्रेत

जरी  दरवर्षी मी नापास होतो
का सगळ्यांना एवढा त्रास होतो ?
खरंच सांगतो,
माझा अभ्यास कुठेही होतो

# एका क्षणात!

एक पुसता स्पर्श होतो
हजारो स्वरांचे नाद
आकाशात उसळताना
एक एक तरंग निर्माण करतो
शब्दविना संवाद
आकाशातल्या चांदण्याशी स्पर्धा
करु लागतात
मंदिराच्या घुमटामध्ये
निर्माण होणारी लहर
वाऱ्यासोबत पसरताना दिसते
हजारो रंगांचे फवारे
अंगावर भिरकावल्यासारखे
अंग अंग निखरु लागते
डोळयात अवकाश साठवायला
निघालेल्या पापण्या
आकाश साठवत
मिटताना दिसतात
स्वप्नांचा एक एक
शिंपला उघडत जातो
स्पंदनाचे मोती
विखरु लागतात
आणि मी, डोळे गच्च मिटून घेतो .....

# ती

ती स्वप्नांची राजकुमारी नाही
की पऱ्यांची राणी नाही
तिच्या पदरात असंख्य तारेही नाहीत
केसांवर खेळणारे वारेही नाहीत

ती,
एक निर्मळ पाण्याचा थेंब
छोटासा डाळिंबाचा दाणा
आकाशाकडे झेपावणारा वारा
नाहीतर,

आईच्या कुशीत गुलाबी पदरात
आईचा निजलेला तान्हा
किंवा
फुलपाखरांचा रंग -
.... माझ्या बोटांवर
उरलेला !

# उल्का

समोराच्याच मंदिराच्या ओट्यावर
बसून काल आकाशाकडे बघताना
वाटलं,
कुणीतरी  रोज आपल्या उपाशी नजरा
आकाशाकडे वळवून वाट पाहात असतो
एका उल्कापाताची
कदाचित,

एखाद्या धुमकेतू मधुन
निघणाऱ्या ज्वालेचा प्रकाश
माझ्याही अंधाऱ्या पृथ्वीवर
चार हजार नाही, तरी चार
उल्कांच्या रुपात पडेल
आणि तेवढाच वेळ का होईना
मीही नजर भरुन
माझं रात्रीच्या अंधारात
उजाडलेलं घर
या उपाशी नजरांनी पाहू शकेल
खरंच,
उद्या पून्हा तारा तुटला की,
मी हेच मागेन .....

# मोजक्या पाऊलखुणा

जगायला,
खरच खूप ताकद लागते ?
पण कशासाठी ?

आजचा दिवस उद्यापर्यंत ढकलून
नेण्यासाठी ?
की रात्रीपर्यंत दिवसाला ओढत
नेण्यासाठी ?

पण तासांच्या शिड्या आहेत ना !
अट एवढीच; पायऱ्या मोजत जायचं
सुटलेल्या पायरीवर पाऊलखुणा
सोडीत
मागे वळुन पाहाता पाहाता
एखादी सिगरेट पेटवली
की तिच्या धुराबरोबर
स्मृती हवेत विरत
जातात

अधेमध्ये पापण्या ओल्या असाव्या
डोळे पुन्हा स्वच्छ होतात
नव्या आसवांसाठी.
खरंच ऐका,
प्रवास सुखकर होतो !

# एक चटका !

पुन्हा कालची आठवण देतो
गाभाऱ्यातल्या स्वप्नांना
जागा करीत
एक चटका

रांगोळीच्या रंगांची
पांढरी किनार
आणि आठवण करुन
देतो,
अंगणात अंथरलेल्या
पारिजातकाची,
एक चटका
आजही खुणावतो
पुन्हा कालच्या नजरांकडे
पुन्हा वेडावतो
त्या निर्भीड क्षणांना
आजही,
मला तीळ तीळ पेटवतो,
एक चटका

# सामना

दिवसाचे पाणी
रात्रीच्या खडकावर
आदळत असते
निर्माण होते .... संध्याकाळ
आणि निर्माण होतो .... सामना !

सरींचे सैन्य
धरेला
बिलगते
माती भिजत असते
आणि निर्माण होतो ....सामना !

एक एक घणाचा घाव
छाती भेदत असतो
ठिणगी ठिणगी साठत असते
निर्माण होत असतो ....सामना!

हेवा, मत्सर
बाष्कळ वाटतात
तत्वांचा दुजोरा
मनं मात्र तोडत असतो
सत्वच मुळी सोडत असतो
आणि
निर्माण होत असतो .....सामना !

तुझा माझ्याशी
माझ्या त्याच्याशी
त्याचा तुझ्याशी
आणि पुन्हा तुझा माझ्याशी
अगदी नकळत....
निर्माण होत असतो .... सामना !

# कविता

शब्दांची वादळं उठविली
सगळ्या कल्पना पालथ्या घातल्या
पण मला कविता सुचली नाही

सतारीच्या तारा छेडल्या
आकाशातले चांदणे तोडले
मनाच्या चंद्राभोवती
तिच्या आठवणीचे चांदणे जोडले
पण
मला कविता सुचली नाही

वाऱ्यांची झुळूक
अंगावर घेतली
मंद वाऱ्यांनी
पापणी  मिटली
फुलपाखरं हातावर
खेळवली
ही लेखणी कुठे कुठे
नाही झटली ....?
पण मला कविता सुचली नाही

कपाकपांनी कॉफी संपवली
मशालीच्या जोशात आगपेटी
पेटवली
कागदांचे चिटोरे घरभर फेकले
रात्र उघड्या डोळयांनी निजवली
पण
मला कविता सुचली नाही

उभ्या रंगमंचावर आडवा झालो
तिच्या आठवणीने वेडा झालो
सगळे स्पॉट्स बंद पडले
मीच रंगमंचावरचा प्रकाश झाला
सगळे अचानक जिवंत झाले
मेकअपनिशी तयार उभे राहिले
ठोक्यांची मोजणी सुरु झाली
मंच पुन्हा रंगुन आले

पण आजही

अजूनही

मला कविता सुचली नाही

# मनोरा

भिंतीवर कोरलेला मनोरा मी
उभ्या आयुष्यासाठी मातीला वाहिलेला
रंग आकार देणारे तुम्ही
सजवणारे तुम्ही
तुमच्याच स्वप्नातून साकारलेला
उभ्या आयुष्यासाठी मातीला वाहिलेला !

तुमच्या दिवाळी मध्ये माझा
रंग बदलतो
प्रत्येकाच्या मनाप्रमाणे
हवा तसा
फक्त माझा सोडून
सर्वांचा राहिलेला
उभ्या आयुष्यासाठी मातीला वाहिलेला !

क्षणाक्षणाला तुमची नजर
मला कोरत जाते
माझ्याच शरीराला
मला न विचारता
तोडत जाते
मी निरंतर बदलत जातो
तुमच्या कल्पनेला
उभ्या आयुष्यासाठी मातीला वाहिलेला !

मी कोण .... कुठला ?
काय बिशाद माझी ?
घडवणारे तर तुम्हीच !
तुमच्याच कल्पनेने
मूर्तिमंत झालेला
उभ्या आयुष्यासाठी मातीला वाहिलेला !

# सिगरेट

रात्रीचे सावट मंदावतांना
सकाळच्या स्पर्शाचे पुसटसे
स्वप्न मनात उमटत असते

धूर मंदावून जेव्हा राखेत
दडलेले सिगरेटचे लालबुंद टोक
वर येणाऱ्या सूर्यासारखे
सतत धुरातून डोकावत
असते

पण
एका सिगरेट मध्ये
रात्र संपते, सोबत
विझतो सूर्य
आणि धूर होऊन
उडालेल्या असतात
पहाटेच्या आशा

आठवत असतं
हाताच्या मुठीत
चुरगाळलेल्या
पॅकेटवरची वैज्ञानिक चेतावनी-

सिगरेट स्मोकींग इज
‘इंजुरियस टु हेल्थ”!

# मी तो ..... असाच !

मला खरंच कुणाशी  स्पर्धा
करायची नव्हती किंवा
नाही आहे,
पण माझ्यात काही कमी असावं
असंही वाटत नाही

मला फक्त आकाराला येणाऱ्या
मातीच्या कणांना
अनुभवायचं आहे
खरंच नक्की काय घडत
असेल, नाही ?

माझ्या मूर्खपणाला
सीमा नाहीत
आणि नसाव्यात

जन्माला आलो
म्हणून जगणं !
या तत्त्वावर मी जगत नाही
मला कधी काळीज फोडून
टाकणारा प्रहारही लागतो
तर कधी डोळे पाणावणारा
स्पर्शही

मी चितेचे चटकेही सहन करीन

तर कधी दिव्यालाही घाबरेन
मी नात्यांना नावे देऊन कधी
बंधनात जखडले नाही
कर्तव्य म्हणून पाळली जाणारी मैत्री  किंवा
प्रेमही मला नको
मला आर्किमिडिजचे सिध्दांत नको
मला आर्किमिडीज हवा
माझ्यासारखाच वेडा !

कदाचित, गुरुत्वाकर्षण शक्तीपेक्षा एक
मोठी शक्ती  या जगात वास करते
मानवाकर्षणाची
तिचे नियम मात्र जाचक आहेत

आयुष्याच्या तऱ्हाही भलत्याच
त्याला लढाई मानणारे
लढतात,
खेळ मानणारे खेळतात,
कोडं मानणारे स्वत: कोड्यात
पडतात!

पण मला ते खऱ्या मित्रासारखे
मैत्रीची सुरुवात जन्मापासून तर
शेवट मरणासोबत
आणि ही मैत्री  मी  कर्तव्य
म्हणून पाळत नाही !

हां ! मृत्यु नावाची प्रेयसी भेटली
की ही मैत्री सुध्दा मी खुशाल
तोडेन!

# माझा आपला .....

मीच,
माझ्यापासुन निघालेला
माझ्यापर्यंत पोहोचणारा माझाच मी
मघाशी माझ्यासाठी मलाच
माझा ठरवणाराही मीच

माझीच माझ्यासाठी चाललेली धडपड
माझेपण हरवत माझीच वाट
पहाणाराही मीच

मलाच माझी माझ्यासाठी गरज
माझीच इच्छा मलाच मिळवायची
माझ्यापर्यंत पाहात असलेला माझ्याच
जगातला अनोळखीही मीच

माझा जन्मही माझ्यासाठी
मीच शोधतोय् माझ्यातला मी
माझी ओळख बदलतोय तो ही
माझ्यातला मीच.

मलाच मी नकोसा तर
माझा प्रतिस्पर्धीही मीच
आणि माझ्याविना जगणारा
माझ्याहून अनोळखीही
मीच .....

# इंद्रधनुष्य

या निर्झरत उगवल्या
कोवळ्या कळयांना
का असा वाटावा हवा
पाझरलेल्या पंखांना पुन्हा
रंगात निजलेले ठेवा

सुटू द्या वाऱ्यांना
बंद कोठडीतून
पुन्हा मनोमनी ह्याला
बेधुंद जगू द्या.

अजूनही ते हिरवेच सारे
चिंब आकाशातले
चाफ्यांचे तारे
राहू द्या असेच
सारे भिजलेले ठेवा

पाझरलेल्या पंखांना पुन्हा
रंगात निजलेले ठेवा

# शाळा

ती शाळा
माझी शाळा

रोज नव्या आठवणींनी
गर्भार असायची
आणि कुशीत मात्र
कालची  पिलावळ खेळवायची

गुरुजींच्या छडीसारखी
छमछम करायची
अवघी रात्र मुलांसाठी
आईसारखी झुरायची
ती शाळा
माझी शाळा
लाजून बसलेल्या परीसारखी
मखमली  साडीच्या जरीसारखी
गुलमोहोराच्या कळीसारखी
गालावरच्या खळीसारखी

ती शाळा
माझी शाळा
आता रुसलेल्या ताईसारखी
वाटेत हरवलेल्या
आईसारखी

ती शाळा,

माझी शाळा

आपल्याच शाळेसारखी

# चंदेर नगरी

स्वप्नापरी या सुंदर देशी
असतील असंख्य स्वप्नं रंगली
गेली असतील कित्येक उधळली
पत्यांच्या त्या बंगल्यापरी

प्रत्येकाचे शिखर वेगळे
तिथवरचे मार्गही निराळे
कुठे स्वप्नांची अंगणात रांगोळी
कुठे स्वत:चीच चिता जळे

रक्तात भिजला आत्मा
आणि चित्कारला हा मेंदू
अरे बंद करा! बंद करा!
नका भावनांचे खेळ मांडू

का फुलातील गंध चोरता
सुगंधाचेही मनोरे तोडता
आम्ही काय हा गुन्हा घडविला
अस्मानात हा तारा जडविला

# ती दिसली ..... एकदाच

मखमालीचे कोवळे रान
सोनेरी पंखाची जाळी
कोवळया कंच पापण्याने खेळ
ओठांच्या पाकळयांची अनामिक लाडी

एकेक स्वप्नांची रंगीत रांगोळी
फुलांच्या बरसातीत जशी
लाजून निघाली
हातावरच्या तिळाप्रमाणे गोड
आठवणीत, भिजून निघाली

# नि:शब्द

शब्दाविना बोलायचे
शब्दांसाठी जगायचे
तुझ्याशी बोलताना मात्र
शब्दांचे घरटे मोडायचे ......